**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 25.11.2025** **वार- मंगळवार**

---

**<u>टीईटीपेपरफुटी</u>**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत नुकत्याच घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेतल्या पेपरफुटीच्या वृत्ताचं महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी खंडन केलं आहे. राज्यभरातून कोणत्याही ठिकाणाहून प्रश्नपत्रिकांची गाडी सीलबंद नसल्याबाबत अथवा गोपनीय प्रश्नपत्रिकांचे बॉक्सेस अथवा पाकिटे सीलबंद नसल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही असं त्यांनी सांगितलं. एका वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या अनुषंगानं परिषदेकडून हे स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.

**<u>आदर्शशाळा</u>**

पुणे जिल्हा परिषदेनं ग्रामीण भागातील शाळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी आदर्श शाळा उपक्रम सुरू केला आहे. याअंतर्गत जिल्ह्यातील १५८ शाळांवर लक्ष ठेवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता घसरल्यामुळे पाच शिक्षकांना जिल्हा परिषदेनं कारणे दाखवा नोटीस पाठवल्याचं जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितलं.

**<u>साखरकारखाना</u>**

ऊसाला ४ हजार १०० रुपये प्रती क्विंटल 'एमएसपी' ची मागणी आम्ही केंद्र सरकारकडं केली आहे असं राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी पुण्यात एका कार्यक्रमात

सांगितलं. उसाचा रास्त आणि किफायतशीर दर आणि साखरेची किमान विक्री किंमत या दोन्हींमध्ये सध्या तफावत असल्यानं कारखान्याचं नुकसान होत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>करार</u>**

शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन, कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण मिळवण्यासह देशाचं २०७० पर्यंत 'नेट-झिरो'चं उद्दिष्ट्य गाठण्यासाठी प्रयत्नशील आहोत, असं ग्रीन सोल्यूशन ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या व्यवस्थापकीय संचालक आरती भोसले-अहिवळे यांनी सांगितलं. ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल आणि ईपीडी ग्लोबल यांच्यात यासंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावरील धोरणात्मक करार करण्यात आला. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली.

**<u>निवडणुक</u>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रारूप मतदार यादीवरील नागरिकांच्या हरकती आणि सूचनांची आढावा बैठक आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली आज झाली. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाच्या व्यवस्थांचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला.

**<u>कर</u>**

पिंपरी चिंचवडमधल्या ज्या गृहनिर्माण संस्थांमधून दररोज १०० किलो किंवा त्याहून अधिक कचरा निर्माण होतो, अशा सोसायट्यांना महापालिकेकडून स्वतःहून कचरा व्यवस्थापन करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केलं जात असून जास्तीत जास्त सोसायट्यांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असं आवाहन महापालिकेनं केलं आहे. पर्यावरणपूरक उपक्रम राबवणाऱ्या गृहनिर्माण संस्था, आस्थापना, हॉटेल व्यावसायिक आणि इतर मालमत्ता धारकांना मालमत्ता करात ५ ते १० टक्के सवलत देण्यात येत आहे.

**<u>सज्जनगडसंस्थान</u>**

श्री रामदास स्वामी संस्थानच्या वतीने यावर्षीचा श्री समर्थ चरण पादुका भिक्षा प्रचार दौरा उद्या २६ नोव्हेंबर ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. पुण्यासह सांगवीतही समर्थ चरण पादुकांचे आगमन होणार आहे. यादरम्यान श्री क्षेत्र सज्जनगडावर होणारे दैनंदिन कार्यक्रम पादुकांसमोर मुक्कामाच्या ठिकाणी होणार आहेत. सर्व समर्थ भक्तांनी याचा लाभ घ्यावा असं आवाहन संस्थानतर्फे करण्यात आलं आहे.

**<u>समतापुरस्कार</u>**

यंदाचा समता पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत आणि अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांना देण्यात येणार आहे. महात्मा फुले यांची १३५ वी पुण्यतिथी आणि समता दिनानिमित्त येत्या शुक्रवारी हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार असल्याची माहिती अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेनं आज पत्रकार परिषदेत दिली.

**<u>उद्घाटन</u>**

अवकाश विज्ञान आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन देत असल्यामुळं विविध देशांमध्ये शांततापूर्ण संबंध निर्माण होण्यास मदत होते असा विचार स्पेस ॲप्लिकेशन सेंटर इस्रोचे माजी संचालक पद्मश्री डॉ. प्रमोद काळे यांनी व्यक्त केला. पुण्यातील एमआयटी विश्वशांती विद्यापीठ आणि संत श्री ज्ञानेश्वर-संत श्री तुकाराम महाराज स्मृती न्यासतर्फे आयोजित व्याख्यानमालेत ते काल बोलत होते. यावेळी काळे यांना समर्पित जीवन गौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<u>सोहळा</u>**

कार्ला इथल्या श्री एकविरा देवी गडावर `एक दिवस कायस्थांचा' हा सोहळा येत्या शनिवारी होणार आहे. सीकेपी समाजाची कुलदेवता असलेल्या एकवीरा देवी गडावरच्या या उत्सवासाठी पुणे, महाड, कल्याण,

डोंबिवली, बदलापूर, भिवंडी, ठाणे आणि बोरीवली इथून विशेष बस सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**<u>मतदारगोंधळ</u>**

पुणे महानगरपालिकेच्या मतदार याद्यांमध्ये झालेल्या गोंधळाविरोधात माजी विरोधी पक्षनेते उज्वल केसकर, सुहास कुलकर्णी आणि माजी नगरसेवक प्रशांत बधे यांनी आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन दिलं आहे. चुकांचं निराकरण होईपर्यंत जाहीर केलेल्या याद्यांना स्थगिती देत, निर्दोष याद्या पुन्हा प्रकाशित करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान १७ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही किमान तापमान साधारण असंच असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**